## यकृत प्रत्यारोपण केंद्राचे उद्‌घाटन

**पुणे :** फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे संस्थापक प्रल्हाद पी. छाब्रिया यांच्या स्मृतिदिनानिमित्त फिनोलेक्स व मुकुल माधव फाऊंडेशनच्या एक कोटी ३० लाख रुपयांच्या अर्थसाहाय्यातून ससूनमध्ये यकृत प्रत्यारोपण केंद्राचे उद्‌घाटन न्युरोफिजिशियन डॉ. आर. एस. वाडिया व ससूनमध्ये यकृत प्रत्यारोपण झालेले पहिले दोन रुग्ण बाबासाहेब जाधव आणि सणस यांच्या हस्ते झाले. यावेळी ससून सर्वोपचार रुग्णालयाचे माजी अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले, फिनोलेक्सचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, रितू प्रकाश छाब्रिया, अरुणा कटारा, ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर नणंदकर, डॉ. शीतल धडफळे, डॉ. कमलेश बोकील, डॉ. संजीव ठाकूर, डॉ. आर. एस. वाडिया, डॉ. नेहा सूर्यवंशी, डॉ. पठाण आदी उपस्थित होते.



सकाळ